R. C. Patel Educational Trust's
R. C. Patel Arts, Commerce and Science College
Karwand Naka, Shirpur 425405, Dist - Dhule, Maharashtra
☎: (02563)257328, 257329 Fax No.: 256170-255189
E-mail: dr.drpatil@gmail.com

RCPET
R.C.PATEL EDUCATIONAL TRUST

President
Hon. Bhupeshbhai Patel

Principal
Dr. D. R. Patil

Annexure IX

## UNIVERSITY GRANTS COMMISSION, BAHADUR SHAH ZAFAR MARG NEW DELHI - 110002.

## PROFORMA FOR SUBMISSION OF INFORMATION AT THE TIME OF SENDING THE FINAL REPORT OF THE WORK DONE ON THE PROJECT

1. TITLE OF THE PROJECT :- **"अहिराणी व गुर्जर बोलीतील लोकसाहित्याचा तौलनिक अभ्यास"**
2. NAME AND ADDRESS OF THE PRINCIPAL INVESTIGATOR :- **Dr. Sudhakar Sitaram Chaudhari**
3. NAME AND ADDRESS OF THE INSTITUTION :- **R. C. Patel Arts, Commerce & Science College Shirpur, Dist. Dhule 425405**
4. UGC APPROVAL LETTER NO. AND DATE :- **No. F. No. 5-280/2014 (HRP) 08 Sept.2015.**
5. DATE OF IMPLEMENTATION :- **01/07/2015**
6. TENURE OF THE PROJECT :- **01/07/2015 to 30/06/2018**
7. TOTAL GRANT ALLOCATED :- **Rs. 7,46,200/-**
8. TOTAL GRANT RECEIVED :- **1st Installment – Rs. 5,07,400/-**
   **2nd installment -- Rs. 1,82,220/-**
   **Total - Rs. 6,89,620/-**
9. FINAL EXPENDITURE :- **Rs. 6,97,573/-**
10. TITLE OF THE PROJECT :- **"अहिराणी व गुर्जर बोलीतील लोकसाहित्याचा तौलनिक अभ्यास"**
11. OBJECTIVES OF THE PROJECT :- **Annexure – I**
12. WHETHER OBJECTIVES WERE ACHIVED :- **Annexure – I**
13. ACHIEVEMENTS FROM THE PROJECT :- **Annexcure – I**
14. SUMMERY OF THE FINDINGS :- **Annexure – I**
15. CONTRIBUTION TO THE PROJECT :- **Annexure – I**
16. WHETHER ANY PH. D.ENROLLED/PRODUCED OUT OF THE PROJECT :- -
17. NO. OF PUBLICATIONS OUT OF THE PROJECT :- **Annexure – I**

(Dr. Sudhakar S. Chaudhari)
**PRINCIPAL INVESTIGATOR**

R. C. Patel Arts, Comm. & Sci. College, Shirpur

(Dr. D. R. Patil)



Scanned with ACE Scanner

Annexure - I

# Final Report of Major Research Project Work

## "अहिराणी व गुर्जर बोलीतील लोकसाहित्याचा तौलनिक अभ्यास"

**File No. F.No.5-280/2014**
**(HRP) 08 Sept. 2015**

**Introduction प्रस्तावना :-**

बोलीतून समाजमनाचा कानोसा घेता येतो. समाजमनाची जडण-घडण तपासता येते. बोली या लोकसाहित्यातूनच समृध्द होत असतात. लोकसाहित्य हे एकूणच समाजाचा दृष्टिकोन व्यापक व समृध्द करीत असते. अशा समृध्द लोकसाहित्याचा अभ्यास होणे काळाच्या ओघात आवश्यक असते.

खान्देशची मुख्य बोली अहिराणी असून या बोलीच्या संपर्क क्षेत्रात इतर अनेक बोलीही रुढ आहेत. खान्देशात बोलीबोलीत सख्य दिसते. अर्थात हे सख्य अनेक पातळयांवर दिसते. त्यासाठी लोकसाहित्याचा अभ्यास आवश्यक ठरतो. परीघ क्षेत्रात अनेक बोली आहेत. त्यातील एक मुख्य बोली गुर्जर बोली होय. गुर्जर बोली ही 'गुर्जर' या लोकसमूहाची बोली आहे. गुजरात राज्यातून स्थलांतर करुन आलेल्या गुर्जर या लोकसमूहाची ही बोली आहे. अहिराणी व गुर्जर बोली या संपर्क क्षेत्रात आल्याने त्यांच्यात एकमेकींच्या लोकसाहित्यातील परिणाम व प्रभाव झालेला दिसतो.

तौलनिक साहित्यभ्यास या शाखेकडे अंतरविद्याशाखीय अभ्यास करणारी शाखा म्हणून बघितले जाते. तौलनिक साहित्यभ्यासात 'भाषा-संस्कृती-साहित्य' यांचा एकमेकांवरील परस्पर संबंधाचा अभ्यास केला जातो. त्यामुळे सध्याच्या काळात तौलनिक साहित्याभ्यासाला महत्व आलेले दिसते. तौलनिक साहित्याभ्यास म्हणजे, 'एका साहित्याची दुसऱ्या एका किंवा अनेक साहित्याशी केलेली तुलना होय.' भाषा, संस्कृती, देशकाल वगैरे परिघ ओलांडून एकापेक्षा जास्त साहित्यांचा तौलनिक अंगाने अभ्यास करणे यात अनुस्यूत असते. त्यामुळे हे साहित्यअभ्यासक्षेत्र अधिक व्यापक व मोठा परिघ असणारे अभ्यासक्षेत्र ठरते. यात राष्ट्र, भाषा, संस्कृती, साहित्य यांचा आंतरिक संबंध तपासणे अपेक्षित असते. तसा अभ्यास बोलीतील लोकसाहित्याचा करता येतो.

तौलनिक साहित्याभ्यासात काही निश्चित तत्वांचा आधार घेऊन अभ्यास केला जातो. साहित्याचा समग्र अभ्यास करता येतो. भिन्न- भिन्न साहित्यांचा समग्र व एकमेकांशी संबंध कसा आहे. हे तपासणे तौलनिक साहित्यात अपेक्षित असते. तौलनिक अभ्यासाला देश, स्थळ, काळ, भाषा, संस्कृती अशा सीमा नसतात. म्हणून ही अत्यंत उपयुक्त व निरपेक्ष वृत्तीने अभ्यास करणारी ज्ञानशाखा म्हणून पुढे येऊन आज सर्वमान्य झालेली दिसते.

P.C. Patel Arts, Comm. & Sci. College



Scanned with ACE Scanner

मौखिक परंपरेतून निर्माण झालेल्या लोकसाहित्याचा अभ्यास तौलनिक दृष्टिने केलेला आहे. त्या-त्या लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडत असते. लोकसाहित्य हे लोकांचे साहित्य असते. ते लोकांच्या जीवनधारणेतुन आकारबध्द होत असते. हे साहित्य म्हणजे लोकभावनेचा सहज स्वाभाविक आविष्कार असतो. हे साहित्य मोखिकतेने आकारबध्द होत असल्याने परंपरेने त्यातील उणिवा, दोष, मर्यादा ह्या संभवतः नष्ट होतात म्हणून ते निर्दोष, अक्षय स्वरुपाचे असते.

खान्देश हा शांत व संपन्न लोकवस्तीचा प्रदेश म्हणून सर्वदूर परिचीत आहे. या खान्देशची मुख्य बोली अहिराणी आहे. ही अभिर लोकांची प्राचीन बोली असून तिला मोठी समृध्द परंपरा लाभलेली दिसते. अहिराणी बोलीत लोकसाहित्य विपूल आहे. मौखिक लोकसाहित्यातील विविध प्रकारच्या रचनाबंधांनी अहिराणी लोकसाहित्य समृध्द आहे. संस्कृती, समाज, भाषा, लोकोत्सव, विधी परंपरा, चालिरीती, संकेत, श्रध्दा, वगैरेंचे समग्र दर्शन या लोकसाहित्यातून घडते. खान्देशची मुख्य बोली अहिराणी असली तरी या खान्देशी बोलीक्षेत्रात विविध बोलीही आपले स्वत्व व अस्तित्व जपून आहे. त्यात काही जातनिदर्शक, प्रांतनिदर्शक बोली दिसतात. त्यातील गुर्जर ही एक मुख्य जातनिदर्शक बोली होय. ही गुर्जर बोली 'गुर्जर' या लोकसमुहाची बोली आहे. हा गुर्जर लोकसमुदाय स्थलांतर करुन खान्देशात स्थिरस्थावर झालेला दिसतो. या गुर्जर लोकसमूदायाचे 'स्थलांतर करणे' हे एक मुख्य वैशिष्ठ्य राहिलेले दिसते. हा समुदाय राजस्थान, गुजरात मधून स्थलांतर करुन आलेला दिसतो. गुर्जर बोलीतील लोकसाहित्य समृध्द आहे. गुर्जर बोलीतील लोकसाहित्यात लोककथा, लोकगीते, लोकोक्ती वगैरे लोकसाहित्यातील सर्व प्रकार आढळतात. प्रस्तुत अभ्यासातून समाज, संस्कृती,भाषा, बोली, चालिरीती, श्रध्दा, परंपरा, संकेत, सण, उत्सव वगैरे बाबींचे समग्र दर्शन घडते. या लोकसाहित्यातून समाजमनाचा कानोसा घेता आला. गुर्जर बोली व अहिराणी बोली ह्या एकमेकींच्या संपर्क क्षेत्रात येत असल्याने बोलीत काही साम्य भेद, स्थळे प्रकर्षाने लक्षात येतात.



Scanned with ACE Scanner

## ११. Objective of the Project उद्दिष्टे :-

अहिराणी व गुर्जर बोलीतील लोकसाहित्याचा तौलनिक अभ्यास करीत असतांना काही निश्चित स्वरुपाचे उद्देश निश्चित करण्यात आलेले आहेत ते पुढीलप्रमाणे.

१) अहिराणी व गुर्जर बोलीतील लोकसाहित्याचा तौलनिक अभ्यास करणे.

२) लोकसाहित्य निर्मितीची बीजे शोधणे, त्या निर्मिती प्रेरणांचा मागोवा घेणे. एकमेकांवरील प्रभवाची चिकित्सा करणे, प्रतिमा, प्रतिके, रुपके यातील साम्यभेद स्थळे अभ्यासणे.

३) तुलनेच्या आधाराने बोलीतील लोकसाहित्य रुपबंध-रचनाबंधाचा (Form) अभ्यास करणे. अहिराणी व गुर्जर बोलीतील आशयविश्लेषण, रचनाविशेष वगैरे बाबींचा अभ्यास करणे.

४) अहिराणी व गुर्जर बोलीतील लोकसाहित्य हे मौखिक परंपरेतून आकारबध्द झालेले दिसते. त्यात लोककथा, लोकगीते, दंतकथा, म्हणी, उखाणे, वाकप्रचार, लोकोक्ती आहेत. त्या साहित्यातील अलंकार व रस शोधणे व लोकसाहित्याचे वर्गीकरण करणे.

५) अहिराणी व गुर्जर बोलीतील लोकसाहित्यातून त्या-त्या समाजाच्या लोकसंस्कृतीची ओळख शोधणे, समाजाची जडण-घडण, जीवनमूल्यांचे दर्शन लोकसाहित्यातून शोधता येते याचा मागोवा घेणे.

६) अहिराणी व गुर्जर बोलीतील अस्सल, अक्षय, वाङ्मयीन व विविध मूल्ये शोधणे व नविन पिढिला लुप्त होणाऱ्या लोकसाहित्यातील अक्षय सौंदर्याची ओळख करुन देणे.

७) अहिराणीतील व गुर्जर लोककथाची आशय, रचना तंत्र संदर्भात तुलना करणे.

८) अहिराणी व गुर्जर बोलीतील लोकवाङ्मयातून समाजमनाची जडण-घडण अभ्यासणे. चालिरीती, श्रध्दा, संकेत, विधी, लोकश्रध्दा, परंपरा, विधीवर प्रकाश टाकणे.

९) लोकगीतांची रचना विशेष अभ्यासणे. भाषिक व वाङमयीन सौंदर्य शोधणे.

१०) गुर्जर बोलीतील व अहिराणी बोलीतील लोककथांची तुलनात्मक अंगाने चिकित्सा करणे.

R.C.Patel Arts, Comm. & Sci. College ★ SHIRPUR ★



Scanned with ACE Scanner

## १२. Details of Objectives were achieved. साध्य झालेली उद्दीष्टे -

अभ्यासासाठी जी उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली होती. ती साध्य झाली. अभ्यासातून काही ठळक बाबी लक्षात आल्या त्या पुढीलप्रमाणे -

१) गुर्जर बोली ही अहिराणी बोलीप्रमाणेच प्राचीन बोली असून तिला मोठा इतिहास आहे. या बोलीतून समूहाच्या संस्कृतीवर पुरेसा प्रकाश पडतो.

२) लोकवाङ्मयाने या बोली समृध्द आहेत. त्याचा या लोकवाङ्मयातून समूहाच्या जीवनविषयक जाणिवा वा मूल्यांचे दर्शन घडते.

३) दोन्ही बोलीतील लोकसाहित्याची निर्मितीची बीजे शोधता येतात. ती एकमेकांशी पुरक तर काही बाबतीत त्यात भिन्नता जाणवते.

४) दोन्ही बोलीतील लोकवाङ्मय हे मौखिक परंपरेने आल्याने निर्दोषत्व हे महत्वाचे वैशिष्ट्य त्यात आढळते. लोककथा, लोकगीते, दंतकथा, म्हणी, उखाणे, वाकप्रचार विपुल आहेत. हे सर्व वाङ्मय अलंकार, रसयुक्त जाणवते. भाषिक दृष्टया समृध्दता प्रस्तुत वाङ्मयात आढळते. भाषिक विविध अलंकार, रस वगैरे बाबी विपूल प्रमाणात आढळतात.

५) समाजाची स्थिती गती दोन्ही बोलीतील रुढ म्हणीवरुन लक्षात येते. याला या बोलीतील म्हणीही अपवाद नाहीत. म्हणी विपूल आहेत. म्हणीत वैविध्यता आहे. म्हणीतून समाज, संस्कृती, परंपरा, चालिरिती, संकेत, श्रध्दा, रुढी, धारणा, कल्पना वगैरे बाबींवर पूरसा प्रकाश पडतो. म्हणीचा वापर बोलीत मोठया प्रमाणावर होतो. म्हणींचा अर्थ हा सुज्ञपणाशी जोडला जातो. समाजाची वैचारिक समृध्दता यातून लक्षात येते.

## 13. Achievement from the Project प्रकल्पाची यशसिध्दी -

बोलीच्या अभ्यासातून आपल्याला आपल्या पूर्व संस्कृतीची, समाजाची ओळख होते व आपल्या जाणिवा प्रगल्भ होतात. बोलीच्या अभ्यासातून नविन वाङ्मयीन सौंदर्य लक्षात येते. कारण बऱ्याच बोली ह्या अलिखित आहेत. त्यामुळे या बोलीतील वाङ्मय हे एका पिढिकडून दुसऱ्या पिढीपर्यंत मौखिक स्वरुपाने आलेले आहे. त्यामुळे ते साहित्य अस्सल व अक्षर साहित्य आहे. अशा शुध्द साहित्याचा अभ्यास करण्यामध्ये एक वेगळे समाधान व आनंद आहे. काळाच्या ओघात अस्सल साहित्याची वानवा असल्यामुळे बोलीभाषेतील वाङ्मयाला अधिक महत्व येणार आहे.

आपली ओळख आपल्या बोलीद्वारे होते. समाजाचे सण, उत्सव, व्रत, वैकल्ये, समृध्द परंपरा याद्वारे आपला ठसा आपण उमटवू शकतो. त्यामुळे आपली भाषा दुसऱ्या भाषिक परिसरात जावू शकते. बोलीतील मौखिक वाङ्मय जे आपल्या पिढिपर्यंत आलेले आहे त्याला आपण जिवंत ठेवू



R. C. Patel Arts, Comm. & Sci. ... SHIRPUR

Scanned with ACE Scanner

शकतो. लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे, वाक्प्रचार, सुभाषिते यावर जर आपण प्रकाश टाकला तर आपल्या भाषेला राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरांवर दर्जा मिळू शकतो.

## १४. Summary of the Project -

बोलीतील समृध्दता ही लोकसाहित्यावर अवलंबून असते. हे अस्सल लोकसाहित्य मौखिक असल्याने त्याला मोठी समृध्द परंपरा लाभलेली दिसते. ह्या समृध्द पंरपरांचा धांडोळा घेणे प्रस्तुत होते. एकाच प्रदेशात भिन्न- भिन्न भाषा-बोली रुढ असतात. त्यांचे अस्तित्व एकमेकींच्या परीघात असते. एक बोली कुठे संपली व दुस-या बोलीला कोठुन आरंभ होतो हे ठरविणे अवघड असते. बोली ह्या एकमेंकीत मिसळलेल्या(Mixer) असतात. लोकसाहित्यातील भिन्न- भिन्न प्रकार अलग-विलग करणे कठीणअसते. पण त्यांच्यात काही साम्य-भेद स्थळे सापडतात.

अहिराणी व गुर्जर बोलीतील लोकसाहित्याच्या निर्मिती प्रेरणांचा शोध घेतल्यावर त्या निर्मिती प्रेरणांत काही बाबतीत साम्य स्थळे सापडतात. अहिराणी व गुर्जर बोलीतील निर्मिती प्रेरणा, उदगम, रचना-विशेष, आशयविश्व, रचनाबंध, व्याप्तीकक्षा, जीवनदृष्टी वगैरे अनेक बाबतीत प्रस्तुत बोलीतील लोकसाहित्यात साधर्म्य कसे व कोणाशी, वैधर्म्य कसे व कोणाशी लोकसाहित्याच्या उदगमाची बीजे यामागील कारणांचा वेध घेतला आहे. थोडक्यात तौलनिक अभ्यासाद्वारे लोकसाहित्याचे समग्र आकलन करुन घेता आले. बोलीतील लोकसाहित्यातील आशयसौंदर्य, रचना-विशेष, भाषिक, वाङमयीन-रुप रचना विशेष, अलंकारीक सौंदर्य शोधणे मोठे रंजक व उदबोधक ठरले. बृहद प्रकल्पातील 'लोकसाहित्य' या पहिल्या प्रकरणामध्ये लोकसाहित्य ही संकल्पना स्पष्ट करुन लोकसाहित्याचे स्वरुप व वैशिष्टयांसबंधी चर्चा केलेली आहे. लोकसाहित्याची परंपरा व वाटचाली संदर्भात विस्तृत उहापोह केलेला आहे.

प्रस्तृत बृहद प्रकल्पातील दुसऱ्या प्रकरणात अहिराणी बोली भाषा, अहिराणी बोलीचे क्षेत्र याविषयी मांडणी केल्यानंतर 'खान्देश व अहिराणी या नावाविषयी सोपपत्तिक चर्चा केलेली आहे. त्यावरुन काही ठळक निष्कर्ष नोंदविलेले आहेत.' 'खान्देश' या नावावरुन 'खान्देशी बोली' व या बोलीच्या उपबोलींचाही परामर्श या प्रकरणात घेतलेला आहे. अहिर लोकांची भाषा म्हणजे अहिराणी 'अहीर' हे नेमके कोठून स्थलांतर होऊन आले त्याविषयी विवेचन केलेले आहे. 'अभिर-अहिर'व यावरुन 'अहिराणी' या अपभ्रंशात्मक वाटचालीचा मागोवा यात घेतलेला आहे.

बृहद प्रकल्पातील गुर्जर बोली या प्रकरणात 'गुर्जर' समुदयाचा इतिहास, संस्कृतीवर प्रकाश टाकून 'गुजर' शब्दाच्या व्युत्पत्ती रचनेवर प्रकाश टाकलेला आहे. गुर्जर बोलीची व्याकरण व्यवस्था अर्थरचना व्यवस्थेवर प्रकाश टाकून अंतिम निष्कर्ष नोंदविलेली आहेत.



R.C.Patel Arts, Comm. & Sci. College ★ SHIRPUR ★

Scanned with ACE Scanner

बृहद प्रकल्पातील तौलनिक साहित्याभ्यास या प्रकरणात तौलनिक शब्दाचा अर्थ व व्युत्पत्ती संदर्भात चर्चा केलेली आहे. तौलनिक साहित्याभ्यासाच्या अभ्यासक्षेत्राच्या व्याप्तीकक्षेवर प्रकाश टाकून संकल्पनात्मक मांडणी करुन अंतिम निष्कर्ष नोंदविलेली आहेत.

बृहद प्रकल्पातील अहिराणी बोलीतील लोककथा या प्रकरणात अहिराणी लोककथांचे वर्गीकरण करुन लोककथा निर्मिती बीजे, स्वरुप, आशयावर चर्चा केलेली आहे. लोककथावरुन समाजमनाचा पुरेश्या प्रमाणात अंदाज बांधता येतो. त्याला अहिराणी बोलीही अपवाद नाही.

प्रकल्पातील गुर्जर बोलीतील लोककथा प्रकरणात लोककथांचे वर्गीकरण करुन लोककथांचे स्वरुप-आशय- रंचनाबंधा विषयी विस्तृत चर्चा केलेली आहे. सामाजिक संकेत, रुढी-परंपरा, चालिरीती वगैरे बाबींवर लोककथांतून पूरेशा प्रमाणात प्रकाश पडतो.

बृहद प्रकल्पातील प्रकरण सातव्यात अहिराणी व गुर्जर बोलीतील लोकगीते आहे. त्यात अहिराणी व गुर्जर लोकगीतांचे आशयानुसार वर्गीकरण करुन लोकगीतांच्या आशययुक्त, रचनाबंध, यमक, प्रतिमा, प्रतिके, अलंकार वगैरे बाबींवर चर्चा केलेली आहे. बोलीतील लोकगीतांची तुलना करुन अंतिम निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

बृहद प्रकल्पातील अहिराणी व गुर्जर बोलीतील लोकोक्ती प्रकरणात म्हणी, उखाणे, वाक्प्रचार यांचे वर्गीकरण करुन चर्चा केलेली आहेत. लोकोक्तींचे स्वरुप, रचनाबंध, अर्थबंध यावर प्रकाश टाकलेला आहे. व अंतिम निष्कर्ष नोंदविलेले आहे.

बृहद प्रकल्पातील समारोप व अंतिम निष्कर्ष या प्रकरणात बोलीतील लोकसाहित्याची तुलना केल्यानंतर हाती आलेले निष्कर्ष टळकपणे नोंदविलेले आहेत.

## १५. Contribution to the Society

प्रस्तुत बृहद संशोधन प्रकल्पाच्या अभ्यासातून अहिराणी व गुर्जर बोलीतील लोकसाहित्याचा तौलनिक अभ्यास हा पहिल्यांदाच अभ्यासकांसमोर येत आहे. या अगोदर अशा प्रकारचा अभ्यास झालेला नसल्याने अभ्यासकांना गुर्जर व अहिराणी बोलीतील लोकसाहित्याच्या साम्य-भेद स्थळांविषयी निर्मिती बीजां विषयी माहिती होत आहे.

बोलीतील लोकसाहित्याच्या अभ्यासातून आपल्या पूर्व संस्कृतीची समाजाची आपल्या अस्तित्वाची ओळख होऊन आपल्या जाणिवा प्रगल्भ होणार आहेत. बोलींच्या अभ्यासातून नविन वाङ्मयीन सौंदर्य लक्षात येते. प्रस्तृत अभ्यासातून अभ्यासकांना, समाजाला दोन बोलीतील एकसंघत्व, क्षेत्रबहुलता वगैरे गोष्टी विषयी महत्व पटणार आहे.



Scanned with ACE Scanner

१६. **No. of Publication out of the project -**

१) 'खान्देशातील सण उत्सवांचे स्वरुप (भारतीय सण-उत्सवांचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व) संपादक - डॉ. डी.आर.पाटील, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव (२०१५) (पृ. १२०-१२५)

२) 'गुर्जर समाज व संस्कृती' (पृ. ८३-८८) (IRFA'S UNIRESEARCH- Multidisciplinary International E-Research Journal) २०१६

३) 'गुर्जर बोलीभाषेतील म्हणी : आशय-अभिव्यक्ती' (पृ.१२३-१२८) Vidyawarta- International Research Journal २०१७

४) 'अहिराणी बोलीचा इतिहास' रिसर्च जर्नी, संपा.- डॉ. धनराज धनगर, मल्टिडिसिप्लिनरी इंटरनॅशनल इ. रिसर्च जर्नल - २०१८

५) 'गुर्जर या बोलीभाषेतील वाक्प्रचार, स्वरुप व अभिव्यक्ती', प्रिटींग एरिया Vol.०२, एप्रिल-२०१८ (पृ.४८ ते ५०)

R.C.Patel Arts, Comm. & Sci. College ★ SHIRPUR ★

Dr. Sudhakar S. Chaudhari

Principal
R.C.Patel Educational Trust's
R.C.Patel Arts,Comm. & Sci. College
Shirpur.Dist.Dhule 425 405



Scanned with ACE Scanner